रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

# मुंबईतील पूर नियंत्रण सिद्धता : जनपंचायत

## दि. १६ व १७ जून २००९

## अहवाल

**पार्श्वभूमी**

दि. २६ जुलै २००५ ! मुंबईच्या इतिहासातून आणि मुंबईकरांच्या स्मरणातून कधीही पुसला जाऊ शकणार नाही असा हा दिवस ! त्या दिवशी मुंबई आणि मुंबईच्या आसपासचा सारा परिसर जलमय झाला. अखंड तीन दिवस मुंबईचे विविध भाग पाण्याखाली राहिले. अतिवृष्टी; त्यामुळे आलेले महापूर आणि समुद्रातील उधाणाची भरती हे तीन घटक एकत्र येताच मुंबईची पुरेपूर दुर्दशा झाली. विस्कटलेले जनजीवन मूळपदावर यायला जवळपास दोन आठवडे लागले. या आपत्तीत ११०० पेक्षा अधिक माणसे मृत्यूमुखी पडली आणि अब्जावधी रुपयांचे नुकसान झाले. त्या घटनेस आता चार वर्षे झाली असली तरी अद्याप त्या दिवसाच्या आठवणी जनमानसातून गेलेल्या नाहीत.

**संकल्पना**




अतिवृष्टी आणि भरतीच्या वेळा एकत्र आल्या तरीही मुंबई जलमय होते. हा अनुभव मुंबईच्या नागरिकांनी गेली २/३ वर्षे घेतलेला आहे. अशा प्रसंगांना तोंड देण्याची काय तयारी प्रशासनाने केली आहे हा प्रश्न त्या त्या वेळेला चर्चेत येतो पण त्या वेळी खूप उशीर झालेला असतो. म्हणून रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या **''विलासराव साळुंखे अध्यासना''**च्या वतीने **'मुंबईची पूरनियंत्रण सिद्धता : जनपंचायत'** आयोजित करण्यात आली. ही जनपंचायत दि. १६-१७ जून २००९ असे दोन दिवस रोज दुपारी १-३० ते सायं. ७-०० या वेळेत मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात संपन्न झाली. मुंबईतील नागरी जीवनाशी संबंधित सर्व प्रशासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी व स्वयंसेवी संस्थांना एकत्र आणण्याचा हा प्रयत्न होता.

सर्व प्रशासकीय यंत्रणांनी आपापल्या कार्यक्षेत्रात केलेल्या पूर्वतयारीची माहिती जनतेला द्यावी व या आपत्ती निवारणाच्या कामात जनतेकडून आपल्या काय अपेक्षा आहेत ते लोकांसमोर मांडावे; त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधींनी व स्वयंसेवी संस्थांनी आपल्या शंकांचे निरसन करुन घ्यावे; आपत्तीच्या संदर्भात प्रशासन व जनतेमध्ये माहितीची देवाणघेवाण व्हावी व जनतेला विश्वासात घेतले जावे ही या कार्यक्रमामागील कल्पना होती.

**कार्यक्रम तपशील**







दि. १६ जून २००९ रोजी जनपंचायतीचे प्रास्ताविक भाषण रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे महासंचालक डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांनी केले. जनपंचायतीचे निमंत्रक श्री. माधव भांडारी यांनी जनपंचायत आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली. उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री श्री. रामभाऊ नाईक यांच्या हस्ते झाले. आपल्या उद्घाटकीय भाषणात त्यांनी सांगितले की जनता व शासकीय यंत्रणा यांच्यात सुसंवाद निर्माण होण्यासाठी जनपंचायतीसारख्या उपक्रमांची आवश्यकता आहे व त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे.






'मुंबईची उत्पत्ती व भौगालिक इतिहास' या विषयावर पर्यावरण तज्ञ श्री. नंदकुमार मोघे यांनी स्लाईड-सादरीकरणाद्वारे माहिती दिली. मुंबईच्या भौगोलिक रचनेबाबतची तसेच मुंबईतील निसर्ग, हवामान, जनजीवन, ऋतमान याबद्दल सविस्तर निवेदन श्री. मोघे यांनी आपल्या भाषणात केले. यानंतरच्या सत्रात एम.एम.आर.डी.ए. तर्फे श्री. नंदर्गीकर यांनी एम.एम.आर.डी.ए. ने पूरनियंत्रणासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती उपस्थितांना दिली. यानंतर प्रश्नोत्तरे व चर्चेचे सामूहिक सत्र झाले व दिवसाचे कामकाज संपले.




जनपंचायतीच्या दुसऱ्या दिवशी दि. १७ जून रोजी ठाणे महानगरपालिकेचे मुख्य अभियंता व आपत्ती निवारण अधिकारी श्री. भट यांनी ठाणे महानगरपालिकेच्या पूरनियंत्रणसिध्दतेविषयी सविस्तर सादरीकरण केले. ठाणे महानगरपालिकेचे उपमहापौर श्री. अशोक भोईर हे या सत्राच्या अध्यक्षस्थानी होते.

बिग एफ एम रेडीओतर्फे श्री. राम यांनी त्यांनी केलेल्या आपत्ती नियोजनाची माहिती दिली. मुंबई पोलिसांतर्फे व.पो.नि. परब यांनी माहिती दिली. मुंबई अग्निशमनदलातर्फे श्री. करगुपीकर यांनी सादरीकरण केले. विमानतळ प्राधिकरणाच्या पूरनियंत्रण सिद्धतेविषयी श्री. मुखोपाध्याय यांनी माहिती दिली. श्री. किरिट सोमय्या यांनी जनपंचायतीचा समारोप केला.

दोन दिवसांच्या या जनपंचायतीत स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, लोक प्रतिनिधी, व सर्वसामान्य नागरिक असे ६५ जण सहभागी झाले.